# अभिनव बिंद्रा, सायना नेहवालसह सहा क्रीडापटूंवर माहितीपट

क्रीडा प्रतिनिधी

मुंबई

एखाद्या स्पर्धेसाठी क्रीडापटू कशा पद्धतीने तयारी करतात या विषयावर आधारित माहितीपट प्रदर्शित होत आहे. ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता अभिनव बिंद्रा, बॅडमिंटनपटू सायना नेहवाल यांच्यासह पाच क्रीडापटूंच्या कार्यपद्धतीचा आढावा घेण्यात आला आहे.

ट्रॅव्हलिंग विथ द प्रोज या नावाचा हा माहितीपट ईएसपीएन या वाहिनीवर २ जूनपासून सात भागांमध्ये दाखवण्यात येणार आहे. या माहितीपटात गोल्फपटू जीव मिल्खा, टेनिसपटू महेश भूपती, फॉर्म्युला वन शर्यतपटू नरेन कार्तिकेयन, नेमबाज अभिनव बिंद्रा, स्नूकरपटू पंकज अडवाणी आणि बॅडमिंटनपटू सायना नेहवाल यांच्या सरावावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. ही एक अनोखी संकल्पना आहे, याबाबत एप्रिल २०१० मध्येच मी सविस्तर विचार केला, असे या माहितीपटाचे निर्माते बिक्रम सलुजा यांनी सांगितले. क्रीडापटूंना मैदानावर आपण नेहमीच पाहतो, पण मैदानाबाहेरच्या त्यांच्या जगण्याचा मला वेध घ्यायचा होता, असे त्यांनी पुढे सांगितले. या खेळाडूंशी संबंधित खेळ संघटनांनी या माहितीपटासाठी सहकार्य केल्याचे सलुजा यांनी सांगितले. या माहितीपटासाठी टेनिसपटू महेश भूपतीच्या कारकीर्दीचा आढावा घेण्यात आला. या माहितीपटाची मी आतुरतेनें वाट बघत आहे, असे महेश म्हणतो. त्यांनी माझ्यासह ऑगस्ट २०१० मध्ये चित्रीकरण केले. तो काळ माझ्या कारकीर्दीतला आकर्षक टप्पा होता. लोक खेळाडूंना मिळणाऱ्या ग्लॅमरचा विचार करतात, पण क्रीडापटूंचे आयुष्य प्रत्यक्षात कसे असते याची माहिती प्रेक्षकांना मिळू शकेल असे त्याने सांगितले.